दूरध्वनी: २५४५३४९०

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महाागरपालिका भवन डॉ. अल्मेडा रोड, पांचपाखाडी, ठाणे - ४०० ६०२
THE MUNCIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र. ठा.म.पा./२१५ दिनांक १५ /०५ /२०१८

## जाहिर आवाहन

विषय: वृक्षाच्या भोवतालचे काँक्रीटीकरण / डांबरीकरण / लाद्या बसविणे / पेवरब्लॉक लावणे / कोबा इत्यादी बांधकाम काढण्याबाबत ...

उपरोक्त विषयान्वये सर्व नागरीकांस कळविण्यात येते की, आपण वास्तव्य करीत असलेल्या सोसायटी/ भोगवटीच्या / वावर असलेल्या जागेवरील वृक्षांच्या भोवती काँक्रीटीकरण / डांबरीकरण / लाद्या बसविणे / पेवरब्लॉक लावणे / कोबा करणे इत्यादी बांधकाम केल्यामुळे असे निदर्शनास आले की, वृक्षाच्या खोडाला व मुळांना हवा (ऑक्सीजन) व पाणी याचा पुरवठा होत नाही, वृक्षाच्या खोडास जमिनीलगत इजा होऊन तेथील वाढ खुंटते व त्यामुळे वृक्ष कमकुवत होऊन उन्मळुन पडते. अशाप्रकारच्या घटनेमुळे जिवित तथा वित्तहानी होण्याची शक्यता असते.

*महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (१) अन्वये वृक्ष तोडणे अथवा कोणत्याही प्रकारे वृक्षास हानी पोहचविणे तसेच स्वत:च्या मालकीच्या किंवा अन्य जमिनीतील वृक्ष तोडण्यास किंवा हानीस कारणीभूत होणारे कृत्य निर्बंध असून त्याचे उल्लंघन करणारी व्यक्ती अधिनियमानुसार दंड अथवा कारावास या शास्तीच्या कारवाईस पात्र ठरत आहे.*

महाराष्ट्र (नागारी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण ५ नुसार 'झाडे तोडण्यावरील निर्बंध आणि झाडे लावण्याचे व त्याचे जतन करण्याचे दायित्व', कलम ११ 'झाडांचे जतन करण्याची जबाबदारी' (१) नुसार ... ज्याला झाड लावण्याचा निर्देश देण्यात आला आहे असा जमिनीचा मालक तथा भोगवटदार त्या झाडाची योग्य वाढ होत आहे आणि त्यांचे चांगले जतन होत आहे हे पाहण्यास जबाबदार राहील व तो अशा झाडाच्या किंवा झाडाच्या स्थितीविषयाचा, तीन वर्षांच्या कालावधीसाठीचा अहवाल सहा महिन्यांतून एकदा वृक्ष अधिका-याला देईल. ज्या क्षेत्रामध्ये ती जमीन असेल अशा नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास त्या जमिनीवर अस्तित्वात असणा-या इतर सर्व झाडांचे जतन करणे हे सुध्दा अशा मालकाचे किंवा भोगवटादाराचे कर्तव्य असेल अशी तरतूद आहे.

प्रकरणी वर नमूद केल्यानुसार आपल्या मालकी हक्काच्या / भोगवटीच्या / वावर असलेल्या जमिनीवरील अस्तित्वातील सर्व वृक्षांच्या खोडाच्या सभोवती १ मीटर जागा मोकळी ठेवण्याची कार्यवाही **De-Concretization** करण्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी आपली राहील. त्यानुसार कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (१) अन्वये आपणावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र होवू शकता हयाची कृपया नोंद घेणे.

(केदार पाटील)
प्र. वरिष्ठ उद्यान अधिक्षक / वृक्ष अधिकारी,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.